**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - १७**

**ड प्रभाग समिती,**

**कार्यपत्रिका क्र. ८**

**सभावृत्तांत**

दिनांक ०७/११/२०१४ वेळ दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे नोव्हेंबर २०१४ ची मासिक सभा शुक्रवार दि. ०७/११/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता ड क्षेत्रिय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा.श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर | सदस्य |
| २.मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ३.मा.श्री. रामदास गेणभाऊ बोकड | सदस्य |
| ४. मा.श्रीम. विमल काळे | सदस्य |
| ५. मा. श्री. राजेंद्र जगताप | सदस्य |
| ६. मा. श्रीम. जवळकर वैशाली राहुल | सदस्य |
| ७. मा. श्री. विलास नांदगुडे | सदस्य |
| ८.मा. श्री. विनोद नढे | सदस्य |
| ९.मा. श्री. प्रमोद ताम्हणकर | सदस्य |

याशिवाय मा.डी.एम.फुंदे, प्रभाग अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी, सचिव,सभा शाखा, मा.गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा, मा. डॉ. सतिश गोरे, पशु वैद्यकीय अधिकारी मा. ओहोळ, उपअभियंता स्थापत्य,मा.रविंद्र पवार, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा. अजय जाधव, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. गोसावी, उद्यान निरीक्षक, मा. गायकवाड, आरोग्य निरीक्षक इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष हया सभेस अनुपस्थित असल्याने मा. सदस्य श्री. विलास नांदगुडे यांनी पुढीलप्रमाणे सुचना मांडली.

आजचे बैठकीचे अध्यक्षपद मा. सदस्या श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर यांनी स्वीकारावे.

सदर सुचनेस मा. श्री. रामदास गेणभाऊ बोकड सदस्य यांनी अनुमोदन दिले.

तदनंतर मा. सदस्या श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारले.

मा.अध्यक्षा यांचे मान्यतेने सभेमध्ये खालीलप्रमाणे ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१ तापकीरनगर येथील मोरया कॉलनी स.नं. ७१ मध्ये कलम २०५ अंतर्गत रस्ता तयार करणे

विषय क्र. २ प्रभाग क्र. ४३ जिजामाता हॉस्पिटल प्रभागातील किरकोळ दुरुस्तीची कामे करणे या कामातुन बी ब्लॉक पिंपरी गल्ली नं. १६ ते ३१ मधील कामे करणे

विषय क्र. ३ हिन्दी शाळा व ज्ञानीजी गुरुद्वारा शेजारची मुतारी पाडुन त्या जागी Pay and Use या आधारावर मुतारी आणि शौचालय करणे

विषय क्र. ४ काळेवाडी नढेनगर येथील पंचनाथ चौक ते विठ्ठन रुक्मिणी मंदिराकडे येणा-या रस्त्याला कै. बाळोबा खंडू नढे पथ असे नामकरण करणे

तदनंतर मा. अध्यक्षा यांनी दिनांक ७/११/२०१४ रोजी प्रभाग समितीची सभा दिनांक १३/११/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत येत असल्याचे प्रकट केले.

सही/-
(सौ. अनिता मच्छिंद्र तापकीर )
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

क्रमांक – ड/१३/काvि/१०९ /२०१४

दिनांक – १९ /११/२०१४

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - १७**

**ड प्रभाग समिती,**

**कार्यपत्रिका क्र. ८**

**सभावृत्तांत**

दिनांक १३/११/२०१४ वेळ दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे नोव्हेंबर २०१४ ची तहकुब मासिक सभा गुरुवार दि. १३/११/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता ड क्षेत्रिय कार्यालयाच्या “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे | अध्यक्षा |
| २. मा.श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर | सदस्य |
| ३.मा. श्रीमती निता विलास पाडाळे | सदस्य |
| ४.मा.श्री. रामदास गेणभाऊ बोकड | सदस्य |
| ५. मा.श्रीम. विमल काळे | सदस्य |
| ६. मा. श्रीम. जवळकर वैशाली राहुल | सदस्य |
| ७.मा. श्री. राजेंद्र गणपत जगताप | सदस्य |
| ८. मा. श्री.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ९. मा. श्री. विनोद नढे | सदस्य |
| १०. मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ११. मा. श्रीमती सुनिता राजेश वाघेरे | सदस्या |
| १२. मा. श्रीमती सविता धनराज आसवाणी | सदस्या |

याशिवाय मा.डी.एम.फुंदे, प्रभाग अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी, सचिव,सभा शाखा, मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा, मा. डॉ. सतिश गोरे, पशु वैद्यकीय अधिकारी मा. ओहोळ, , मा. दिलीप सोनवणे, मा. रत्नपारखी, मा. रामदास टकले, उपअभियंता स्थापत्य, मा. नितीन देशमुख, उपअभियंता, मा. दिक्षित, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा.रविंद्र पवार, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा. बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. अजय जाधव, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. गोसावी, उद्यान निरीक्षक, मा. बैचे, हॉर्टीकल्चर सुपरवायझर मा. गायकवाड, आरोग्य निरीक्षक इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

दिनांक ७/११/२०१४ रोजीचे बैठकीमध्ये विषय दाखल करण्यात आलेले ऐन वेळचे विषयांवर मंजुरी देणेत आली.

ठराव क्र. १६ विषय क्र. १

दिनांक १३/११/२०१४ विभाग –स्थापत्य

सुचक – मा. श्रीमती विमल काळे अनुमोदक – मा. सविता आसवानी

संदर्भ : मा. श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर यांचा दि. ०७/११/२०१४ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४८ मध्ये तापकीरनगर येथील मोरया कॉलनी, सर्व्हे नं. ७१ मध्ये राहणा-या नागरीकांना जाण्यायेण्यासाठी रस्ता नाही. या ठिकाणी कलम २०५ अंतर्गत रस्ता केल्यास तेथील नागरीकांची सोय होणार असल्याने तापकीरनगर, मोरया कॉलनी येथील स.नं. ७१ मधील श्री. ठोंबरे यांचे घरापासुन ते श्री. कुदळे यांचे घरापर्यंत तसेच श्री. बलकवडे यांचे घरापासुन ते श्री. कुलकर्णी यांचे घरापर्यंत ६ मीटर रुंदीचा रस्ता कलम २०५ अंतर्गत करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्र. १७ विषय क्र. २

दिनांक १३/११/२०१४ विभाग –स्थापत्य

सुचक – मा. सविता आसवानी अनुमोदक – मा.विमल रमेश काळे

संदर्भ : मा. सविता आसवानी यांचा दि. १७/१०/२०१४ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४३ जिजामाता रुग्णालय प्रभागातील घाटांची किरकोळ दुरुस्तीचे कामाचे आदेश देणेत आलेले आहेत. सदर घाटाचे काम नुकतेच पूर्ण करणेत आले असुन सद्यस्थितीत तेथे १०० टक्के काम करणेची आवश्यकता नाही. पिंपरी बी ब्लॉक गल्ली क्र. १६ ते ३१ मधील पेव्हिंग ब्लॉक व कॉंक्रीट खराब झाले असल्याने या कामातुन तेथे पेव्हींग ब्लॉकची दुरुस्ती तसेच कॉंक्रीटचे काम करुन दुरुस्तीची कामे करुन घेणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्र. १८ विषय क्र. ३
दिनांक १३/११/२०१४ विभाग –स्थापत्य
सुचक – मा. सविता आसवानी अनुमोदक –मा. विमल रमेश काळे

संदर्भ : मा. सविता आसवानी यांचा दि. ०७/११/२०१४ रोजीचा प्रस्ताव

सन २०१४-१५ मध्ये मंजूर सुलभ, बी ब्लॉक १९ हे ज्ञानीजी गुरुद्वारा आणि हिंदी शाळे शेजारील मुतारी पाडून त्या जागी पे अँड युज या आधारावर मुतारी आणि शौचालय करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्र. १९ विषय क्र. ४
दिनांक १३/११/२०१४ विभाग –स्थापत्य
सुचक – मा. विनोद जयवंत नढे अनुमोदक – मा. प्रमोद ताम्हणकर

संदर्भ : मा. विनोद जयवंत नढे यांचा दि. ०७/११/२०१४ रोजीचा प्रस्ताव

काळेवाडी, नढेनगर येथील पंचनाथ चौक ते विठ्ठल रुक्मिणी मंदिराकडे येणा-या रस्त्याला **"कै. बाळोबा खंडू नढे पथ"** असे नामकरण करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

यानंतर आरोग्य विभाग, पाणीपुरवठा, अतिक्रमण व स्थापत्य, विद्युत व पाणीपुरवठा विभागाच्या कामकाजाबाबत सन्मा. नगरसदस्य यांनी पुढील प्रमाणे मत व्यक्त केले.

**मा. निता विलास पाडाळे -** सध्या पिंपरी चिंचवड परिसरात डेंग्युचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणावर असुन नागरीकांचे जागृतीसाठी रिक्षामधुन स्पीकरद्वारे आवाहन करण्यात येत आहे त्या स्पीकर्सचा आवाज स्पष्ट ऐकू येत नाही .यास मा. अनिता तापकीर यांनीही दुजोरा दिला.

फिनोलेक्स कॉलनी येथे घराच्या वर टाकलेल्या टायरमध्ये पाणी निदर्शनास आले असतानाही ते टायर उचलले गेले नाहीत. आरोग्य विभागाचे संबंधित कर्मचा-यांना आवश्यक ते दंड आकारणीचे अधिकार देणे आवश्यक आहे.

शिवकृपा कॉलनी येथे सांडपाण्याचे कनेक्शन दिलेले आहेत परंतु स्टॉर्म वॉटर लाईन स्वच्छ नसल्याने त्यांना नोटीसा बजावणेत आलेल्या आहेत. सदर ठिकाणी कारवाई करणे आवश्यक आहे.

औषध फवारणीचे कामात अनियमितता दिसुन येते

**मा. अध्यक्षा, श्रीमती चोंधे –** औषध फवारणीसाठी टेंपो आहेत परंतु एका वेळेस एक वॉर्डातील काम पूर्ण होऊ शकत नाही त्यामुळे टेंपोच्या फे-या वाढवाव्यात. तसेच संबंधित ठेकेदारास ठरवून दिलेल्या नियोजनानुसार कार्यवाही होणे आवश्यक

जेथे औषध फवारणीसाठी गाडी जाईल तेथील नागरीकांच्या स्वाक्षरी घेणेत याव्यात

पॅम्प्लेट वाटप केलेले नाही.

**मा. रामदास बोकड –** ड प्रभाग परिसरात नवीन पॅम्प्लेट वाटणेत आलेले नाहीत. डेंग्युच्या प्रादुर्भावाबाबत ड क्षेत्रिय कार्यालयाकडील आरोग्य निरीक्षकांनी संबंधित प्रभागाचे नगरसदस्य यांचे संपर्कात असणे आवश्यक असुन यामुळे नागरीकांमध्ये जनजागृती करणे सुलभ होणार आहे.

**मा. श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर -**ड क्षेत्रिय कार्यालय परिसरात ज्या ठिकाणी मोकळया जागा आहेत त्या ठिकाणी कचरा टाकू नये असे बोर्ड लावणेत यावेत.

टेरेसवर पाण्यामध्ये अळया होतात त्यामुळे टेरेसची साफसफाई करुन घेणेकामी दक्षता घेणेबाबत नागरीकांना आवाहन करणेत यावे या कामी संबंधित आरोग्य कर्मचा-यांस तशा सूचना देणेत याव्यात

**सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे -** नियमितपणे व वेळापत्रकानुसार औषध फवारणी करण्यात येत आहे. डेंग्युचा प्रादुर्भाव असणा-या व तक्रारी येणा-या ठिकाणी प्राधान्याने फवारणी करण्यात येते. आरोग्य निरीक्षक व तपासणी करणा-या कर्मचा-यांमार्फत घरोघरी माहितीपत्रके वाटण्याचे काम करण्यात येत आहे. स्टॉर्म वॉटर लाईन स्वच्छ करण्यात आलेल्या आहेत.

**मा. रामदास बोकड –** प्रभाग/मुख्यालयाकडील निविदा विषयक कामे अतिशय संथ गतीने चालू आहेत. ज्या ठेकेदारांनी कामांचे आदेश घेतलेले नाहीत त्यांचे आदेश रद्द करावेत.

**लेखाधिकारी, श्री. आव्हाळे -** एकूण ७९ निविदा प्रसिध्द केलेल्या असुन ७० ठेकेदारांना करारनामा करणेकामी पत्र दिले आहे तसेच ४९ कामांचे आदेश देणेत आलेले असुन १३ प्रकरणे सील करणेकामी मा. स्थायी समिती कडे दिलेली आहेत. १७ ठेकेदरांना करारनामा करणेकामी पत्र पाठविणेत आले असुन पुन:श्च पत्र देणेत येत आहे.

**मा. रामदास बोकड** – बीआरटीएस रस्त्यावर फळेविक्रेते सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत अनधिकृत रित्या फळविक्री करतात. अतिक्रमण विभागाकडून कारवाई करणेत येत नाही तेथे वाहतुकीची कोंडी होते तसेच सृष्टी चौकातही संध्याकाळचे वेळेस भाजीवाले संपूर्ण रस्ता अडवतात.

**सचिव, तथा प्रशासन अधिकारी श्री. लोणकर** - अतिक्रमण विभागाकडून सातत्याने कारवाई करणेत येते परंतु मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार फेरीवाल्यांकरीता हॉकर्स झोन करण्यात येत आहे. ड क्षेत्रिय कार्यालयाकडील हॉकर्स झोनबाबतची सर्व माहिती मुख्यालयास देणेत आलेली असुन मुख्यालयाकडून जे आदेश प्राप्त होतील त्यानुसार पुढे कार्यवाही करणेत येईल.

**मा. श्री. राजेंद्र जगताप -** ड प्रभाग परिसरात कुत्र्यांचा प्रचंड प्रादुर्भाव आहे.
कुत्रे पकडणारी गाडी पाठविणेस पशू वैद्यकीय विभागाकडून दिरंगाई होते.

**मा. श्रीमती पाडाळे -** राजवाडेनगर कॉलनी परिसरात एक कुत्रे १० ते १२ लोकांना चावले आहे तसेच नदीच्या कडेला असलेल्या तिरंगा कॉलनी येथे डुकरांचा प्रचंड प्रादुर्भाव आहे. कृष्णानगर येथे मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झालेला आहे.

**मा. अध्यक्षा –** कुत्री पकडणेसाठी गाडी पहाटे येणे आवश्यक आहे.

**मा. सुनिता वाघेरे** – मा. स्थायी समितीला पशु वैद्यकीय विभागाचे कामाचा अहवाल सादर करावयाचा आहे. तसेच मा. आयुक्त सो. यांनी दोन दिवसात समक्ष भेटणेबाबत सूचना दिल्या आहेत त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**मा. रामदास बोकड** – कुत्र्यांचे बंदोबस्तासाठी कर्मचारी आवश्यक असतील तर आम्ही देऊ शकतो.सद्यस्थितीत एकच गाडी पशू वैद्यकीय विभागाकडे उपलब्ध असुन वेळेत तक्रारींचे निराकरण होणेकामी प्रत्येक प्रभागासाठी एक स्वतंत्र गाडी आवश्यक आहे. त्यास मा. थोपटे च मा. अध्यक्षा यांनीही दुजोरा दिला व कर्मचारी कुमक वाढविणेबाबत मत व्यक्त केले.

**डॉ. सतीश गोरे, पशु वैद्यकीय अधिकारी** – मोकाट कुत्री पकडण्यासाठी ज्या एजन्सींची नियुक्ती करण्यात आलेली आहे त्यापैकी एका एजन्सीची मुदत संपली असुन नवीन एजन्सी नियुक्त करण्यास दोन महिन्यांचा कालावधी जाईल. सध्या सारथी हेल्पलाईनवर अनेक तक्रारी देणेत आलेल्या आहेत त्या तक्रारींचा निपटारा करणेसाठी उपलब्ध असलेली यंत्रणा वापरणेत येत आहे.त्यामुळे सध्या या यंत्रणेवर प्रचंड ताण आहे. मा. आयुक्त सो. यांचेशी चर्चा करुन प्रकरणी लवकरात लवकर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मा. फुंदे, क्षेत्रिय अधिकारी** – पशु वैद्यकीय विभागाकडील कामकाजाबाबत मा. स्थायी समिती सभागृहामध्ये विस्तृत चर्चा झालेली आहे. मा. आयुक्त सो. यांनी पशु वैद्यकीय विभागाबाबत आलेल्या तक्रारींचे प्रमाण विचारात घेऊन पशु वैद्यकीय अधिकारी यांनी मा. आयुक्त सो. यांचेशी समक्ष भेट घेऊन प्रश्न सोडवावा.

**मा. श्री.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे-** काटे वस्ती येथील पाण्याचे पाईपलाईनचे कामाचे आदेश दिलेले असताना सुध्दा अद्याप काम सुरु झालेले नाही . सदर काम पूर्ण होण्यास किती कालावधी लागेल व पाणी पुरवठा विभागांतर्गत ड प्रभागासाठी अंदाजपत्रकीय तरतुद किती आहे याबाबतची माहिती देण्यात यावी.
नवीन पाण्याचे टाकीचे कामाबाबत काय कार्यवाही करण्यात आली

**श्री. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता**–काटे वस्ती येथील पाण्याचे पाईपलाईनचे टेस्टींगचे काम सुरु असलेने लवकरच कामाची सुरुवात करण्यात येईल व मुदतीत काम पूर्ण करण्यात येईल.

सदर ठिकाणी असलेल्या जुन्या पाण्याचे टाकीतुन पाण्याचा वापर बंद करण्यात आला आहे. नवीन टाकी बांधणेबाबतचा प्रस्ताव मा. महापालिका सभेपुढे प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सादर करण्यात येत आहे.

**मा. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे** - सदर दोन्ही प्रकरणी मा. कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांनी या आठवडयात कार्यवाही पूर्ण करावी.

**मा. अध्यक्षा** - गणेश पार्क, दुर्वांकुर पार्क येथे पाण्याची तीव्र अडचण आहे.

**मा. रामदास बोकड -** ड प्रभाग परिसरात दोन वेळा पाणी पुरवठा करण्यात येत नाही. एक वेळेस पाणीपुरवठा करणेत येत असुन त्याचा कालावधी कमी आहे. अनधिकृत नळकनेक्शन तोडणेत यावेत. जे नागरीक कायम स्वरुपी स्थाईक झालेले आहेत व अधिकृत नळजोड घेण्यास तयार आहेत त्यांना नळजोड देणेत यावे. या साठी सर्व्हे करणेत यावा. यासाठी बरेच दिवसापासुन पाठपुरावा करणेत येत आहे परंतु विभागाकडून कार्यवाही करणेत आलेली नाही.

**मा. कैलासभाऊ थोपटे –** एक वेळेस पाणीपुरवठा केला तरी किमान तीन तास पाणीपुरवठा होणेची आवश्यकता आहे. तसेच सर्व प्रभागात समान पध्दतीने पाणी पुरवठा होणे आवश्यक आहे. यासाठी योग्य पध्दतीने नियोजन करावे अन्यथा नागरीकांना पाणी पट्टीत ५० टक्के सवलत द्यावी.

**मा. श्रीमती पाडाळे –** सद्यस्थितीत एक वेळ पाणीपुरवठा करणेत येत असुन तो पुरेसा नाही तसेच काही ठिकाणी एक वेळेसही पाणी पुरवठा होत नाही. पाईपलाईन दुरुस्तीबाबत पाठपुरावा करावा लागतो.

**श्री. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता-** दोन वेळेस पाणीपुरवठा करणेबाबतच्या विषयावर वरिष्ठ पातळीवर निर्णय घेणेत येईल.

**मा. श्री. राजेंद्र जगताप -** अंदाजपत्रकातील तरतुदी खर्ची पडत नाहीत व सदर तरतुदी वाया जातात.

**मा. अध्यक्षा-** सन २०१४-१५ या वर्षीचे ड प्रभागाचे अंदाजपत्रकीय तरतुदीमधुन आतापर्यंत किती खर्च झाला आहे, कोणकोणती कामे करण्यात आलेली आहेत याची माहिती ड प्रभाग समिती सदस्यांना देणेत यावी.

**मा. रामदास बोकड –** ड प्रभाग समितीचे सदस्यांना अंदाजपत्रकात समाविष्ट करणेत येत असलेल्या कामांबाबत माहिती देणेत यावी.

**लेखाधिकारी, श्री. आव्हाळे –** सध्या स्थायी अस्थापनेचे अंदाजपत्रक तयार करणेचे काम सुरु आहे. मा. आयुक्त व मा. मुख्यलेखापाल यांनी प्रभाग निहाय अंदाजपत्रकीय तरतुद ठरवून दिल्यानंतर प्रभागाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येते.

**मा. फुंदे, क्षेत्रिय अधिकारी –**प्रभागांतर्गत सर्व विभागांनी अंदाजपत्रकातील तरतुदी व खर्ची पडलेली रक्कम याबाबतची माहिती सदस्यांना त्वरीत उपलब्ध करुन द्यावी.

तदनंतर मा. अध्यक्षा यांनी सर्व अधिकारी व पदाधिकारी यांचे आभार मानुन प्रभाग समिती सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा**
**सचिव, सभाशाखा**
ड क्षेत्रिय कार्यालय,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे-१७

क्रमांक – ड/१३/कावि/ ११० /२०१४
दिनांक –१९ /११/२०१४